# देगलूर महाविद्यालयास एम.एस्सी भौतिकशास्त्र व डी.टी.एल.या दोन नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

देगलूर - अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून एम.एस्सी भौतिकशास्त्र व डी.टी.एल. (उळश्रिर ळप ढर्रीळेप ड्ढु ) या दोन नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२- २३ पासून सुरु करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगाना या तीन राज्याच्या सीमावर्ती भागातील व ग्रामीण शेतकरी- शेतमजुरांच्या मुलामुलींना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे म्हणून इ.स.१९६३ मध्ये अडत व्यापारी शिक्षण संस्थेची व देगलूर महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

मराठवाड्यातील सीमावर्ती भागातील मुलामुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी हैद्राबाद ,पुणे,औरंगाबाद यासारख्या शहरात जाण्याची गरज पडू नये म्हणून या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाद्वारे केल्या जाणा-या ज्ञानदानाच्या पवित्र कार्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळाली आहे. देगलूर महाविद्यालयाच्या स्थापनेच्या काळापासून ते आज देखील हजारो विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर स्तरावरील दर्जेदार उच्च शिक्षण दिले जात आहे . बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बरोबर एम.ए. (मराठी, हिंदी, इतिहास लोकप्रशासन, राज्यशास्त्र ), एम.एस्सी .रसायनशास्त्र व वनस्पतीशास्त्र आणि एम.कॉम या विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. इतकेच नव्हे तर लोकप्रशासन, मराठी, राज्यशास्त्र, रसायनशास्त्र व वनस्पतीशास्त्र या



विषयाचे मान्यता प्राप्त पीएच.डी. संशोधन केंद्र असून आजपर्यंत २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी पूर्ण केली आहे. सर्व विषयात निपुण असणारा प्राध्यापक वर्ग लाभलेला असून महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबरोबर त्याच्या सर्वांगीण विकासाकडे मानवी दृष्टीकोणातून लक्ष देणारा प्राध्यापक वर्ग महाविद्यालयात कार्यरत आहे. यावर्षी महाराष्ट्र शासनाकडून एम. एस्सी भौतिकशास्त्र व डी.टी.एल. या दोन नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरु करण्यासाठी मान्यता मिळाली आहे.

या नवीन अभ्यासक्रमास मान्यता मिळाल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव श्री शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष श्री नारायणराव मैलागीरे, सहसचिव श्री सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष श्री विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य श्री राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उग्रतवार , श्री जनार्दन चिद्रावार ,श्री गंगाधर जोशी, श्री रवींद्र अप्पा दाडे. श्री देवेंन्द्र मोतेवार श्री चंद्रकांत नारलावार,प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ऊपप्राचार्य श्री निवृती गोविंदवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक श्री गोविंद जोशी यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या नवीन अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. तसेच भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. भानुदास नरवाडे व वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुरेश काशिदे यांचेही आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner